Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / March-April 2025 / VOL -01 ISSUE-V

# Akshardhara Research Journal

## March-April 2025

## VOL -01 ISSUE-V

Akshara Publication
Plot. 42 Akshara Publication Gokuldham Residency
Prerna Nagar Wanjola Road Bhusawal Dist.Jalgaon [M. S.] India 425201

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / March-April 2025 / VOL -01 ISSUE-V

## -: Chief Editor:–

**Dr Priyanka J. Mahajan**
Co-1110/6 Mamaji Talkies area Juna Satara Bhusawal,
Dist. Jalgaom (M.S) India Pincode 425201
Website: https://admrj.com
E-mail : admrj0404@gmail.com

## -: Executive Editor & Publisher :–

**Dr. Girish S. Koli**
42 Akshara Publication Gokuldham Preranangar Wanjola
Road Near Star Lone Bhusawal Dist. Jalgaon
[M. S.] India 425201
**Mobile No: 9421682612**

# Member Of Editorial Board

**DR. E.G. WAJIRA GUNASENA**
Designation : Senior Lecturer (I) In Hindi
Address : Department of Languages, Cultural Studies and Performing Arts University of Sri Jayawardenepura, Nugegoda, 10250, Sri Lanka
Mobile : 0094 112758315
Email Id : wajiragunasena@sjp.ac.lk

**DR. VIVEK MANI TRIPATHI**
Designation : Assistant Professor
Address : Faculty of Afro – Asian Languages and Cultures, Guangdong University of Foreign Studies, Guangzhou, Guangdong, China.
Mobile : 86-18666279640
Email Id : 2294414833@qq.com

**Dr. Girish Kumar Painoli**
Designation : Professor
Address : School of Commerce and Management, Aurora Deemed to be University, Hyderabad India Pin Code:500098
Mobile : 07674938785
Email Id : girishkumar@aurora.edu.in

**Dr.VIVEK ARUN JOSHI**
Designation: Assistan Professor
Address: TES's Institute of Management and Career Development, Bhusawal, Dist. Jalgaon [M. S.] India Pin Code: 425201
Mobile: +91 9881716287
Email Id : admin@ssgbhindimv.com

**ADRJ Disclaimer :**

*For the purity and authenticity of any statement or view expressed in any article. The concerned writers (of that article) will be held responsible. At any cost member of ADRJ editorial Board will not be responsible for anyconsequences arising from the exercise of Information contained in it.*

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / March-April 2025 / VOL -01 ISSUE-V

09

# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य

**प्रा.डॉ.स्मिता म.जाधव**
इतिहास विभाग प्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा जिल्हा – अमरावती

---

**प्रस्तावना -**

छत्रपती शाहू महाराजांचे नाव आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात विशेष उल्लेखनीय ठरते.१९ २० व्या शतकाच्या संधीकाळात होऊन गेलेल्या शाहू महाराजांनी आपल्या अल्पआयुष्यामध्ये केलेले प्रचंड कार्य त्यांच्या अजोड कर्तृत्वाची साक्ष देते. म्हणूनच त्यांचे विषयी ' चिरंजीव त्याचे जगी नाम राहो ' ही उक्ती अत्यंत सार्थ आहे. एक आदर्श राजा, एक जनसामान्यांचा नेता, म्हणून त्यांची लोकप्रियता शेवटपर्यंत कायम राहिली. कोल्हापूर संस्थानाचे प्रजावत्सल शासक असणाऱ्या शाहू महाराजांनी केलेले कार्य महाराष्ट्रामध्येच नव्हे तर भारतातही लोकप्रिय ठरले. जनकल्याणकारी कार्य करणाऱ्या शाहू महाराजांचे कार्य विविधांगी असे होते. इ. स.१८९४ ते इ.स.१९२२ या कालावधीत त्यांनी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व आर्थिक सुधारणांची मुहूर्तमेढ रोवली. दलित, मागासवर्गीय आणि शोषित समाजासाठी त्यांनी जे कार्य केले ते कार्य अतिशय मोलाचे व क्रांतीकारक स्वरूपाचे मानले जाते त्यांनी अस्पृश्यता, शैक्षणिक विषमता आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध लढा दिला. शैक्षणिक विषमतेवर त्यांनी जो प्रहार केला तो असामान्य स्वरूपाचा आहे

**बीजशब्द-** शिक्षण,शैक्षणिक, विकास ,बहुजन, समाज, आधुनिक, विषमता ,अस्पृश्यता, सामाजिक ,आर्थिक, चळवळ, हक्क, अधिकार, सत्यशोधक, चळवळ ,समाज परिवर्तन , विद्यार्थी, शिक्षक ,पुरोगामी

**जन्म व बालपण-**

शाहू महाराजांचा जन्म २६जून१८७४ रोजी झाला. त्यांचे वडील जयसिंगराव आबासाहेब घाटगे हे कागल घराण्याचे जहागीरदार होते. आईचे नाव राधाबाईसाहेब असे होते. त्यांचे मूळ नाव यशवंतराव होते. २५ डिसेंबर १८८३ रोजी कोल्हापूर राज्याचे राजे चौथे शिवाजी यांचा मृत्यू झाला. त्यानंतर चौथे शिवाजी महाराज यांच्या पत्नीने म्हणजे आनंदीबाईसाहेब यांनी जयसिंगराव घाटगे यांचे पुत्र यशवंतराव यांना विधिपूर्वक १७ मार्च १७८४ रोजी दत्तक घेतले. याच दत्तकविधान समारोहात त्यांचे ' शाहू ' असे नामकरण करण्यात आले. कोल्हापूर राज्यात येण्यापूर्वीच कृष्णाजी गोखले, हरिपंत गोखले आणि इंग्रज पर्यवेक्षक फिटझिराल्ड यांच्या देखरेखीखाली त्यांचे शिक्षण सुरू झाले होते. पुढील शिक्षण राजकोट येथील राजकुमार महाविद्यालयात झाले. विद्यार्जना सोबतच शारीरिक शिक्षण त्यांनी प्राप्त केले. १८८५ ते १८८९ याकाळात त्यांनी राजकोट येथील शिक्षण पूर्ण केले.

पुढे त्यांनी १८९० ते १८८४ या काळात धारवाड येथे शिक्षण ग्रहण केले. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या लोकशाही मूल्यांचा त्यांच्या विचारांवर विलक्षण प्रभाव होता. धारवाड येथे त्यांनी सर स्टुअर्ड फ्रेझर, सर रघुनाथराव व्यंकोजी सबनीस या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण ग्रहण केले. इंग्रजी भाषा, राजधर्म, राजनीती, राजनैतिक व्यापार व राज्यकारभारावर यांचे सम्यकदर्शन हा त्यांच्या शिक्षणाचा गाभा होता.

२ एप्रिल १८९४ हा दिवस करवीर संस्थानातील सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखा दिवस.! याच दिवशी शाहू महाराजांनी कोल्हापूर राज्याची सूत्रे आपल्या हाती घेतली. त्यावेळी त्यांनी शिवप्रभूंचा आदर्श समोर ठेवून लोककल्याण हेच आपले राज्य करण्याचे ध्येय राहील ,असे जाहीर करताना ते म्हणाले, "आमचे प्रजाजन सदा सुखी व संतुष्ट असावेत. त्यांच्या हिताची एकसारखी अभिवृद्धी होत जावी व आमच्या संस्थांचा सर्व बाजूंनी अभ्युदय व्हावा, अशी आमची उत्कट इच्छा आहे .यासाठी सर्वांच्या उज्वल राजनिष्ठेची व सहकार्याची आम्हाला आवश्यकता आहे " १

शाहू महाराज ज्यावेळी छत्रपती म्हणून सिंहासनावर आरुढ झाले त्यावेळी प्रशासनात कमालीचे शैथिल्य व अराजकता होती. समाज जीवनात विषमता निर्माण झाली होती. तसेच आर्थिक विषमते बरोबरच धार्मिक क्षेत्रात अनाचार निर्माण झालेला होता. या सर्व परिस्थितीचे महाराजांनी सूक्ष्म निरीक्षण केले. ' प्रजा सुखी तर राजा सुखी 'आणि प्रजेच्या कल्याणातच राज्याचे व हित आहे हा विचार अंगीकारून त्यांनी जे कार्य केले ते त्यांच्या प्रजाप्रेमाची व अफाट कार्यकर्तृत्वाची साक्ष देते. राजकीय क्षेत्रातील त्यांचे कार्य सुवर्णाक्षरांनी लिहिलेले आहे. पण त्याचबरोबर त्यांनी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात केलेले कार्य इतके महत्त्वपूर्ण आहे की , त्याचा विचार केल्याशिवाय आपणास आधुनिक महाराष्ट्राचाच नव्हे तर आधुनिक भारताचा इतिहासही अभ्यासाने शक्य नाही.

कोणत्याही राष्ट्राची प्रगती ही सर्व समाजघटकांना समान संधी असल्याशिवाय होणार नाही हे धोरण नजरेसमोर ठेवून महाराजांनी समाजाने ज्याना अस्पृश्य ठरविले आहे त्यांनाही समान संधी मिळावी ही भूमिका घेतली. महाराष्ट्रात सामाजिक क्रांतीचे बिजारोपण महात्मा

©Copyright 2024 *ADRJ*. All Rights Reserved

ज्योतिबा फुले यांनी केले. त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन शाहू महाराजांनी महाराष्ट्राच्या भूमीत केलेले कार्य अमूल्य आहे. हजारो वर्षांपासून नैसर्गिक हक्कांपासून वंचित असणाऱ्या शोषित, पीडित आणि मागासलेल्या समाजाला स्वाभिमान व आत्मसन्मानाने जीवन जगण्यासाठी ज्या समाजसुधारकांनी प्रयत्न केले त्यात शाहू महाराजांचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. महात्मा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या समाजाची उद्दिष्टे विविधांगी होती. बहुजन समाजाची उन्नती साधण्याकरिता समाजाने केलेले कार्य उल्लेखनीय ठरले. ते कार्य एका चळवळीच्या रूपाने प्रसारित झाले. या चळवळीने शाहू महाराज हे अत्यंत प्रभावीत झाले होते.महात्मा ज्योतिबा फुले नंतर त्यांनी या चळवळीचा तळागाळापर्यंत प्रसार केला.

११ जानेवारी १९११ मध्ये त्यांनी कोल्हापूर येथे परशराम घोसरवाडकर यांचे अध्यक्षतेखाली सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या समाजाचे कार्यकारी मंडळ स्थापन केले "महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक चळवळीची धुरा राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या खांद्यावर घेऊन चळवळीच्या माध्यमातून बहुजन समाजाला शैक्षणिक दृष्ट्या जागृत करण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले. राजर्षी शाहू महाराज हे सत्यशोधक समाजाचे सभासद व अध्यक्ष नव्हते तरी शाहू महाराज म्हणजे सत्यशोधक चळवळ व सत्यशोधक चळवळ म्हणजे शाहू महाराज अशी ख्याती समाजात होती. या चळवळीचे शाहू महाराज यांच्याकडे नेतृत्व जाईपर्यंत ही चळवळ पुणे, सातारा, बडोदे भागात तुरळकपणे होती. तिचा प्रसार ही हा चळवळीचा प्रमाणभूत व प्राणभूत कार्यक्रम होता " २

**सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण :-**

शाहू महाराजांची शैक्षणिक धोरण हे बहुजन हिताय व बहुजन सुखाय या स्वरूपाचे होते. शिक्षणावरील उच्चवर्णीयांची असणारी मक्तेदारी मोडून काढून समाजातील सर्व घटकांपर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचली पाहिजे, असे त्यांनी वारंवार प्रतिपादन करून त्या संदर्भात कृतिशील पाऊले उचलली. शाहू महाराजांनी शैक्षणिक बदलाच्या बाबतीत उचललेले क्रांतिकारक पाऊल म्हणजे त्यांनी आपल्या संस्थानात राबविलेले सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण होय.जे आई वडील मुलांना शाळेत पाठविणार नाही त्यांना दंड करण्यातील येईल, असे त्यांनी सांगितले. सक्तीचा व मोफत शिक्षणासंबंधीचा दृष्टिकोन विशद करताना ते म्हणाले, "सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानाला अत्यंत आवश्यकता आहे. याबाबतीत आमचा गतकाळ म्हटला म्हणजे इतिहासातील एक अंधारी रात्र आहे. फक्त एकाच जातीने विद्येचा मक्ता घेतला होता. मनू आणि त्यांच्या मागून आलेल्या शास्त्रकारांनी खालच्या जातीच्या लोकांवर निर्बंध लादले. आणि कमी जातीच्या लोकांना विद्या मंदिराचे दरवाजे बंद करण्यात आले ". १९१७ मध्ये खामगाव येथे संपन्न झालेल्या बहुजनांच्या शैक्षणिक हिताविषयी आयोजित करण्यात आलेल्या परिषदेत त्यांनी केलेले अध्यक्षीय भाषण अतिशय मार्मिक आहे. सक्तीचे व मोफत शिक्षण अत्यंत आवश्यक आहे, हे त्यांच्या खालील वाक्यावरून लक्षात येते. ते म्हणतात," खालच्या वर्गाच्या लोकांवर, बुद्धीवर आणि ज्ञानावर जे जड जुलमी 'जू' लादले गेले आहे ते झुगारून देण्याची शक्ती समाजाच्या अंगी येण्यास सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची फार जरुरी आहे .यामुळे पुढील पिढी तरी लिहिणारी, वाचणारी होईल अशी मला खात्री आहे." ३

शिक्षण म्हणजे भारतीय समाजाच्या पुनर्निर्माणाचा व पुनरुत्थानाचा राजमार्ग आहे, शिक्षण हाच स्वाभिमानाचा स्त्रोत व प्रेरणा आहे असे ते म्हणत. शाहू महाराजांनी भारतात सर्वप्रथम १९१७ मध्ये प्राथमिक शिक्षणासाठी सक्तीचा कायदा केला. हा कायदा करवीर सरकारच्या गॅझेट मध्ये प्रकाशित करण्यात आला. हाच कायदा भारतामध्ये शैक्षणिक धोरण राबवि राबविताना पुढील राज्यकर्त्यांसाठी मार्गदर्शक ठरला. भारतातील शैक्षणिक क्रांतीच्या दृष्टीने टाकलेले शाहू महाराजांचे हे पाऊल त्यांच्या दृष्टेपणाची साक्ष देते. राजाराम हायस्कूल व राजाराम महाविद्यालय या शिक्षण संस्थांमध्ये अस्पृश्यांना मुक्त प्रवेश आणि मोफत शिक्षण सुरू केले. महाराष्ट्रात व भारतात पुढील काळात शिक्षणाच्या ज्या योजना अंगिकारण्यात आल्या,अस्पृश्य व मागासलेल्या लोकांना शिक्षण देण्याच्या ज्या योजना आंगिकारण्यात आल्या त्या आपल्या संस्थानात कित्येक वर्षापासून सुरू करून अमलात आणल्या.यातून त्यांची दूरदृष्टी लक्षात येते. त्यांनी अवलंबिलेल्या सक्तीच्या शिक्षा योजनेचा बराच फायदा झाला. “इ. स. १९१८ मध्ये २७ शाळेतून १८९६ विद्यार्थी शिक्षण घेत होते. इ. स. १९२२ मध्ये ४२० शाळांतून २२,००० विद्यर्थी शिक्षण घेत होते. शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला एक हजार रुपयांची शिष्यवृत्ती जाहीर केली होती.”४

**अस्पृश्य, बहुजन व स्त्रियांसाठी शिक्षण :-**

सर्व प्रजा सुशिक्षित झाली तरच त्यांना त्यांचे सामाजिक हक्क मिळतील. याच ध्येयासाठी ते आयुष्यभर झटले. अस्पृशोद्धाराचे कार्य करण्यासाठी अस्पृश्यांमधून सुशिक्षित तरुण पुढे का येत नाही, याची त्यांना चिंता होती. त्यांची ती चिंता दूर करण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना उच्च शिक्षणासाठी व संशोधनाकरिता प्रेरित करून आर्थिक सहकार्य केले .

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे या कारणाने त्यांनी विविध शिक्षण संस्थांची स्थापना केली. १९०८-१९०९ मध्ये त्यांनी मुलींसाठी श्रविकाश्रम नावाचे वस्तीगृह काढले. खास चित्रकलेच्या अध्ययनाकरिता दोन विद्यार्थ्यांना त्या काळात त्यांनी इटलीला पाठविले.१९०६ मध्ये किंग एडवर्ड महामेडन एज्युकेशन सोसायटी निर्माण करून मुस्लिम विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी त्यांनी कार्य केले.

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / March-April 2025 / VOL -01 ISSUE-V

विद्येचा वाराही ज्यांना शिवला नव्हता अशा वंचित व उपेक्षित अशा समाजाला पोटाशी धरून त्यांना प्रेमाने गोंजारले व त्यांच्यापर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचवली. आपल्या राज्यातील स्पृश्य व अस्पृश्यांच्या वेगवेगळया शाळा बंद करून महाराजांनी स्पृश्य अस्पृश्य अशा एकत्र शाळेच दालन भारतात पहिल्यान खूल केल. त्यांनी शिक्षण खात्याला सूचना केल्या की, " माझ्या राज्यात यापुढ कुठल्याही शाळेत अस्पृश्यता पाळली जाणार नाही . सर्व जातीधर्माच्या विद्यार्थ्यांना एकत्रच बसवलं जाव. अस्पृश्य विद्यार्थ्यांशी शिक्षकांनी ममतेन वागाव . यांना चांगल मार्गदर्शन देऊन त्यांच्या बौद्धिक प्रगतीसाठी झटाव.. ज्यांना या सूचना माण्यानासतील त्यांनी दीड महिन्यात नोकरीचा राजीनामा द्यावा." ५ विविध सामाजिक संस्था व संघटनांद्वारे समाजातील दुर्बल घटकांना मदत केली. त्या योजना आजही अस्तित्वात आहे. त्यावरून त्यांच्यातील द्रष्टेपणाची कल्पना येईल. महाराजांच्या या शिक्षणविषयक कार्यापासून स्फूर्ती घेऊन अनेक समाज नेत्यांनी बहुजन समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आपल्या भागातही आपण करावे अशी दुर्दम्य प्रेरणा महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या नेत्यांमध्ये प्रकर्षाने निर्माण होऊन त्यांनी शैक्षणिक संस्थांचे बिजारोपण केले. आणि शिक्षणाची गंगा शहरीच नव्हे तर खेडोपाडी पोहोचविली. शाहू महाराजांनी ज्ञानाची जी मशाल चेतविली गेली ती अधिक प्रज्वलित करण्याचे कार्य पुढील नेत्यांनी केले. कर्मवीर भाऊराव पाटील (रयत शिक्षण संस्था सातारा),कर्मवीर भाऊराव हिरे (मराठा शिक्षण संस्था मालेगाव), डॉ. पंजाबराव देशमुख (शिवाजीशिक्षणसंस्था,अमरावती) , डॉ.बाबासाहेब आंबेडकर, (पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई), डॉ. बापूजी साळुंखे, (श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर), डॉ.कर्मवीर मामासाहेब जगदाळे (शिवाजी शिक्षण संस्था, बार्शी) यांनी स्थापन केलेल्या या संस्थांची नावे अग्रक्रमाने घ्यावी लागेल.

वर्तमान युगात महाराष्ट्रात शिक्षण संस्थांचे जे महाकाय असे जाळे विणल्या गेले आहे व लाखो करोडो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत त्यांची मुहूर्तमेढ शाहू महाराजांनी रोवली आहे. बुद्ध, कबीर आणि महात्मा फुले यांच्या विचारांनी प्रेरित होऊन शाहू महाराजांनी भारतातील मागासलेल्या समाजाला स्वातंत्र्याच्या मार्गावर नेले.याबाबत डॉ. य.दि.फडके म्हणतात, " गेल्या शतकात म. फुले यांनी स्वाभिमानाचे व समतेचे बी पेरून जे झाड लावले त्याला खतपाणी घालून काळजीपूर्वक वाढविले ते शाहू महाराजांनी" छत्रपती शाहू महाराजांच्या शैक्षणिक चळवळीचा एक परिणाम असा की, त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती निर्माण व्हावी, ती रुजावी म्हणून कोल्हापूर संस्थानात ग्रंथालय चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. स्वातंत्र्यपूर्वकाळात देशातील पहिला ग्रंथालय कायदा कोल्हापूर संस्थानाने केला. बौद्धिक भूक भागविण्यासाठी ग्रंथालयांची नितांत आवश्यक असते, हे ओळखून शाहू महाराजांचे हे पुरोगामी विचार महाराष्ट्राच्या शैक्षणिक धोरणातील महत्त्वाचे पाऊल ठरले ." ६

महाराष्ट्रात शैक्षणिक क्रांतीचे बीजारोपण महात्मा फुलेंनी केले. नवीन समाजाच्या निर्मितीला आवश्यक असणारी मूल्ये यांचे बीज शिक्षणाद्वारे रोवले जाते त्याची पूर्ण जाणीव मनी ठेवून महात्मा फुलेंनी केलेल्या कार्याची ज्योत संपूर्ण महाराष्ट्रात शाहू छत्रपतींनी प्रज्वलित केली. त्यांनी जुन्या रीती, परंपरा यांना फाटा देऊन जे कार्य केले त्याला राजश्रय मिळाल्यामुळे ते अधिक जोमाने प्रसारित झाले. राज्याची शिक्षण पद्धती जेवढी विकसित असेल तेवढे साक्षर व सक्षम विद्यार्थी घडतील हा त्यांचा विश्वास होता. आणि त्या दृष्टीने त्यांनी शैक्षणिक धोरण राबविले. त्याचा परिणाम आज दृश्य स्वरूपात दिसून येत आहे. त्यांनी पुरोगामी महाराष्ट्राचा जो पाया रचला त्यामुळेच महाराष्ट्रात सामाजिक, आर्थिक क्षेत्रात अमुलाग्र परिवर्तन झाले . विशेष म्हणजे महात्मा फुले व त्यांच्या काळापूर्वी जो बहुजन व दलित समाज शिक्षणापासून वंचित होता त्याला शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला. महाराजांनी जे शैक्षणिक धोरण राबविले ते अतिशय निर्णायक स्वरूपाचे व क्रांतिकारी स्वरुपाचे ठरले.

**मूल्यमापन :-**

राजर्षी शाहू महाराज हे बहुगुणी शासक होते.म्हणूनच कर्मवीर शिंदे त्यांचा उल्लेख सर्वांग्पूर्ण राजपुरुष अशा शब्दात करतात to अगदी सार्थ आहे. जनतेच्या हृदयसिंहासनावर अधिराज्य गाजविणारे शाहू महाराज हे राजा तर होतेच पण त्याहून त्यांच्यातील माणूस हा अतिशय मोठा होता. त्यांना दत्तविधानाने राजपद मिळाले हा अपूर्व योगायोगच..! पण त्यांनी समाजसुधारणेचा वसा घेतला. हा निश्चितच योग्य होता. त्यांनी समाज सुधारण्याचे व्रत मृत्यूपर्यंत अखंडपणे चालविले. समाजाच्या उन्नयनासाठी त्यांच्यामध्ये असलेली धडपड व विकासाचा ध्यास अतुलनीय होता. आणि त्यांच्या या समाजशील उपक्रमाच्या केंद्रस्थानी शिक्षण होते. त्या दृष्टीने त्यांनी स्वातंत्र्यपूर्वकाळात राबविलेले शैक्षणिक धोरण ही आधुनिक महाराष्ट्राची नांदी होती. आज त्याचा प्रचंड वटवृक्ष आपणास पाहायला मिळतो.

शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्यामुळेच तळागळातील लोक शिक्षण घेण्यास पुढे सरसावले आहे. शिक्षणाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील गोरगरीब जनतेचा आर्थिक स्तर सुधारण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. बहुजन समाजातील गरीब विद्यार्थी आज कुलगुरू पदापर्यंत, प्राध्यापक, वकील, डॉक्टर, इंजिनिअर, प्रशासकीय मोठ मोठे अधिकारी म्हणून देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत सन्मानाने काम करू लागले आहेत. त्या दृष्टीने शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे ठरले व त्या दृष्टीने पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले. २००१ -०२ पासून राज्य सरकारच्या मदतीने सर्वशिक्षण अभियान ही महत्वाकांक्षी योजना महाराष्ट्रासह अन्य राज्यांमध्ये सुरु करण्यात आली आज शिक्षणाचा झालेला वटवृक्ष ही महर्षी कर्वे, महात्मा फुले, सावित्रीबाई

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / March-April 2025 / VOL -01 ISSUE-V

फुले, आदी समाजसुधारकांची तर शिक्षणाचे झालेले सार्वत्रीकरण हे राजर्षी शाहू महाराज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह अनेक समाजसुधारकांच्या कार्याचा परिपाक आहे.

**संदर्भ :-**

१. कठारे डॉ. अनिल, महाराष्ट्रातील समाजसुधारक, पृ.२३०,२३१
२. पवार डॉ. जयसिंगराव (संपादक), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर पृ.५१५
३. जाधव प्रा. वसंत, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास,पृ. १४२,१४३
४ कठारे डॉ. अनिल, महाराष्ट्रातील समाजसुधारक, पृ.२३७,
५ सावंत शिवाजी , शेलकासाज ललित लेखसंग्रह अस्पृश्यांचा आधारवड, भाषादर्शन पृ. ५७
६. केंद्रे डॉ. संभाजी, लोकराज्य, अंक ९ , पृ.४९

**संदर्भ ग्रंथसूची:-**

१.कठारे डॉ. अनिल, महाराष्ट्रातील समाजसुधारक,विद्या बुक पब्लीशर्स, औरंगाबाद.
२. पवार डॉ. जयसिंगराव (संपादक), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर.
३. जाधव प्रा. वसंत, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास,विद्या प्रकाशन नागपूर.
४ सावंत शिवाजी , शेलकासाज ललित लेखसंग्रह अस्पृश्यांचा आधारवड, भाषादर्शन पृ. ५७
५. डॉ. खराट केंद्रे डॉ. संभाजी किरण लोकराज्य, अंक ९ , माहिती व जनसंपर्क महासंचनालय मंत्रालय, नागपूर.
६. मोरे दिनेश, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, के. एस. पब्लीकेशन, पुणे.
७. डॉ. सावळे / मोरे दीपा , आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास एज्यूकेशनल पब्लीशर्स, औरंगाबाद.

©Copyright 2024 *ADRJ*. All Rights Reserved